Vol 6 Issue 3 Dec 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016

# महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाचे राजकारण आणि नेतृत्वाचा जनाधार

संघरत्न सोनवणे
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,
सा. फु. पुणे विद्यापीठ, पुणे.

## प्रस्तावना –

महाराष्ट्राच्या राजकारणात आंबेडकरी विचारांचे राजकारण करणारे पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे विविध गट व बहुजन समाज पक्ष ओळखले जातात. या पक्षांचे असलेले अस्तित्व किंवा त्याचा सहभाग हा महाराष्ट्राच्या एकूण राजकारणाच्या आकलनात महत्वाचा ठरावा इतका दखलपात्र आहे. याची चर्चा प्रामुख्याने दोन भागामध्ये करता येईल. एक म्हणजे पक्ष म्हणून महाराष्ट्राच्या पक्षीय व निवडणूकीच्या राजकारणामध्ये असलेले अस्तित्व व दुसरे म्हणजे पक्षाच्या विचार सरणीमुळे पक्षाशी जोडलेला पक्षाचा मतदार.

पक्षाला सुरूवातीपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा होता त्यामूळे त्याला भावनिक आधार होता. डह. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करून आपल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक हक्काची जाणीव करून ते मिळविण्यासाठीचा मार्ग दाखविल्यामूळे मागासजाती ह्या पक्षाचा मूळ आधार बनल्या होत्या व यांचे प्रतिनिधीत्वही भक्कमपणे या पक्षाने सुरूवातीच्या दोन दशकामध्ये केल्याचे दिसून येते. दादासाहेब गायकवाडांनी भूमीहिनांच्या प्रश्नासाठी उभारलेला लढा हा अभूतपूर्व असाच होता. कसेल त्याची जमीन नसेल त्याचे काय अशा धोषणेंनी त्यांनी सर्व भूमीहिन, दलित, आदीवासींचे नेतृत्व करून लढा यशस्वी करून दाखविला होता. यानंतरच्या काळात पक्षाने मतदार टिकवून ठेवण्यासाठी शहरीभागांमध्ये लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते. रिपाईच्या इतिहासातील महत्वाचे लढे म्हणजे, रिडल्स्, नामांतर, आरक्षण आणि दलित अत्याचार विरोधी स्थानिक लढे या नंतरचे लढे हे स्थानिक मूलभूत प्रश्नांशी निगडीत अशाच स्वरूपाचे राहिलेले दिसून येतात यामध्ये झोपडपट्टीचा प्रश्न इ. यामूळे रिपाईचा मतदार हा शहरी झोपडपट्या व छोट्या शहरांमध्ये मर्यादीत राहिला.

महाराष्ट्रात मागील ५० वर्षाचा आढावा घेतला तर १९५२ (२), १९५७ (५), १९७७(१), १९९८ (४) व २००४ मध्ये (१) अशा एकूण १३ जागाच लोकसभा निवडणुकित आजवर जिंकता आल्या आहेत. पक्षाला स्वबळावर एकही जागा जिंकता आली नाही. पक्षाला वेळोववळी इतर पक्षांशी युती करणे अपरिहार्य ठरले. आजवर पक्षाला सरासरी २ टक्के इतकीच मते मिळाली आहेत. असे असले तरी महाराष्ट्रामध्ये सत्ता संतुलक पक्ष म्हणून पक्षाचे महत्व आजही कायम आहे.

बहुजन राजकारण करणारा म्हणून ओळख असणाऱ्या बहुजन समाज पक्षाने आपली अंगभूत मर्यादा ओळखून आपली भूमिका सर्वजनवाद पर्यंत नेली आणि जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी म्हणणारा पक्ष हाथी नही गणेश है ब्रम्हा विष्णु महेश है पर्यंत आला आहे. २००४ व २००९ मधील निवडणूकामध्ये पक्षाने विचारसाणीपेक्षा आयात उमेदवारांना तिकीट दिल्यामूळे बसपाची वैचारिक भूमिकाच संभ्रमावस्थेची बनल्याने पक्षाचा पारंपारिक मतदार पक्षापासून दूरावला आहे.

रिपब्लिकन गटांनी प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस-राकाँ आधाडी व भाजप – सेना युती या दोन्ही गटांशी युती केल्यामूळे आंबेडकरी राजकारणाचा भाग असलेल्या मतदारांमध्ये संभ्रमावस्था आहे. मतदारांकडे सशक्त असा पर्यायच नाही असे वाटते. तरीही सत्ताधारी व विरोधक यांना महाराष्ट्रामध्ये एकूण ८ टक्केपक्षा अधिक मतदान हे निर्णायक मतदान असल्याने या समुदायावर सर्वाचा डोळा आहे व आपापल्यापरिने या समुदायाला आकर्षीत करण्याचा प्रयत्न करीत असतात.

आंबेडकरी राजकारणाचा भाग असलेला युवा मतदार हा आप, मनसे व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या आक्रमक धोरणांमूळे यापक्षांकडे सरकत आहे. त्यामूळे यांना टिकवून ठेवणे रिपब्लिकन गट व बहुजन राजकारण करणाऱ्या पक्षांना अवधड बनले आहे. १९६४ साली दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहिनांचा सत्यागृह करून पक्षाच्या मतदारांमध्ये अमुलाग्र बदल धडवून आणला होता. दादासाहेबांच्या धोरणामध्ये प्रामुख्याने शेतकरी, शेतमजूर, भूमिहिन यांचा समावेश होता. आज रिपाईकडे अशा स्वरूपाची धोरणे राबविलेली दिसून येत नाही याचा परिणाम म्हणून या पक्षांचा पारंपारिक मतदारामध्ये वाढझाली नाही व ती जागा प्रस्थापित पक्षांनी भरून काढली आहे. शहरी भागामध्ये कांही प्रमाणात रिपाई गटांचे अस्तित्व दिसून येते. तर ग्रामीण भागामध्ये पक्ष अस्तित्व हिन असल्याने केवळ शहरी मतदारावच रिपाईंचे अस्तित्व टिकून राहिले आहे तसेच मागास जातीतील उच्चशिक्षित, नोकरदार हा रिपाईच्या सततच्या अपयशाने व पक्ष नेतृत्वाच्या दुराव्याने नवीन पक्षांच्या संपर्कात जात असल्याचे चित्र दिसत आहे. मागसजातीचे राजकारण करणाऱ्या पक्षांच्या अंगभूत मर्यादा असल्याकारणाने त्यांना प्रशिक्षीत कार्यकर्ते, संस्थात्मक जाळे, मुबलक साधने, पक्षाची धोरणे यामध्ये बदल करावा लागेल तसेच केवळ निवडणूमध्येच पक्षाचे दिसणारे अस्तित्व विविध कृती कार्यक्रमांमधून दिसून येणे गरजेचे आहे.

## राखीव मतदार संघ आणि रिपाई पक्ष

१९३० साली झालेल्या गोलमेज परिषदेमध्ये मुसलमान, शिख व अस्पृश्य लोकांच्या राजकीय हक्कासाठी चर्चा करण्यात आली व यातून म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये संघर्षास सुरूवात झाली. गांधीनी मुसलमान व शिख समुदायास स्वतंत्र मतदारसंध देण्यात मान्यता दिली परंतु

अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदासंधास त्यांनी विरोध केला कारण अस्पश्य हे हिंदूचाचा भाग आहेत अशी त्यांची भूमिका होती. याबरोबरच अस्पृश्यांचे नेते आहोत अशीही त्यांनी भूमिका मांडली.

गोलमेज परिषदेनंतर भारतात परतल्यावर गांधीना विविध अस्पृश्य संधटनांनी मानपत्र दिले या संधटनांबाबतचे विविध मतभेद त्यावेळीच्या जनतामध्ये प्रकाशित झाले होते. डह. आंबेडकरांनी ब्रिटीश पंतप्रधान, तसेच इंग्लंडचा राजा यांना भारतातील अस्पृश्यांची परिस्थीती कथन केली होती.

डॉ. आंबेडकरच अस्पृश्यांचे खरे नेते आहेत म्हणून भारतातील विविध संधटनांनी त्यांना पाठींब्याची पत्र पाठविली होती. त्यांच्या मार्फत मानपत्रही देण्यात आले होते. डह. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १९२७ महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह, १९३० साली नाशिक येथे चाललेल्या काळाराम मंदीर सत्यागृह, १९३२ अस्पृश्यांनी स्वतंत्र मतदारसंध देण्यासंबंधी परिषद याची नोंद ब्रिटीशवृत्तपत्रे व भारतातील विविध दैनिकांनी धेतली होती .

यापार्श्वभूमीवर अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंध द्यावेत असे मतप्रवाह निर्माण झाले यातूनच खऱ्याअर्थाने मागासजाती आपल्या खऱ्या प्रतिनिधींना निवडून देऊ शकेल. तर कांहीच्या मते संमिश्र मतदारसंध असावे यामध्ये मागासजाती आपले व अमागास अशा दोन्ही प्रतिनिधींना निवडून देतील त्यामूळे यांच्या मध्ये सांमजस्य निर्माण होण्यास मदत होईल. अस्पृश्य जातीच्या मतदानांसाठी कांही स्पृश्य उमेदवार, सहभोजन, संयुक्त सभा, बैठका व अस्पृश्य मतदारांना अकर्षीत करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवतील त्यामूळे स्पृश्य अस्पृश्य अशी फुट पडणार नाही असा मतप्रवाह होता. तर तीसरा मतप्रवाह राखीव जागा ठेवण्यात याव्या अशा स्वरूपाचा होता.

| निवडणूक वर्ष (राखीव जागा) | निवडणूक लढविलेले पक्ष व जिंकलेल्या जागा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कॉंग्रेस | शिवसेना | भाजप | राष्ट्रवादी कॉंग्रेस | रिपाई (सर्व गट) | इतर पक्ष | अपक्ष |
| १९५७(४१) | २७ | . | . | . | ५ | ५ | ३ |
| १९६२(३३) | ३१ | . | . | . | २ | . | . |
| १९६७(१५) | १४ | . | . | . | . | . | १ |
| १९७२(१५) | १२ | . | . | . | १ | १ | १ |
| १९७८(१८) | ६ | . | . | . | ३ | ४ | . |
| १९८०(१८) | १५ | . | . | . | १ | १ | १ |
| १९८५(१८) | १५ | . | १ | . | . | २ | . |
| १९९०(१८) | ९ | १ | ३ | . | १ | ३ | १ |
| १९९५(१८) | ३ | ४ | ८ | . | . | . | ३ |
| १९९९(१८) | ४ | ३ | ६ | ३ | . | . | २ |
| २००४(१८) | ४ | ४ | ५ | ४ | . | १ | |
| २००९(२९) | ६ | ९ | ७ | ७ | . | . | . |
| २०१४(२९) | २ | ९ | १५ | ३ | . | . | . |
| एकूण | १४८ | ३० | ४५ | १७ | १३ | १० | १२ |
| टक्केवारी | ५४: | ११: | १६: | ६: | ५: | ४: | ४: |

ब्रिटीशांनी अस्पृशंना देऊ केलेल्या स्वतंत्र मतदारसंधाला गांधीनी विरोध केला म. गांधी यांनी स्वतःची भूमिका प्राण गेले तरी सोडणार नाही अशीच मांडली. कारण यामूळे हिंदूमध्ये फुटपडेल असे त्यांचे म्हणणे होते. यातूनच पुढे गांधीनी येरवडा येथे आमरण उपोषणास सुरूवात केली व यातून डॉ. आंबेडकर व गांधी यांच्यामध्ये पुणे करार झाला हा ऐतिहासिक पुणे करार म्हणून ओळखला जातो.

याकरारामध्ये डह. आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदारसंधांची मागणी केली होती तर गांधी त्यास विरोध केला होता. शेवटी अस्पृश्यांसाठी राखीव जागां ठेवण्यात याव्यात या अटीवर हा करार करण्यात आला. याकरारामूळे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांना राज्य विधीमंडळामध्ये लोकसभेमध्ये राखीव जागा ठेवण्यात आल्या.

कराराबाबत दोन मतप्रवाह होते. एक कराराच्या बाजूने तर दुसरा कराराच्या विरोधात. कराररच्या बाजूने असलेल्या लोकांची अशी धारणा होती की, सर्व लोकांना यामूळे प्रतिनिधीत्व मिळणार आहे. तर विरोध करणाऱ्या गटांचे म्हणणे होते की, यामूळे केवळ सत्ताधाऱ्यांच्या मर्जीतीलच लोकांना प्रतिनिधीत्व मिळणार असल्याने त्यांच्या प्रतिनिधीत्वाचा समाजाला कोणताही फायदा होणार नाही कारण ते खऱ्या अर्थाने जनतेचे प्रतिनिधीत्व असणार नाहीत. तर स्वतंत्र मतदारसंधामूळे लोकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचे स्वतंत्र असेल. राखीव जागांवर झालेला करार आजतागायत चालू आहे.

आंबेडकरी राजकारण व मागास जातींना खराच फायदा झाला आहे का हा महत्वाचा विषय आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत विचार करावयाचा झाला तर महाराष्ट्रामध्ये अनुसुचित जातींची संख्या ही १३ टक्के आहे. महाराष्ट्रात १९७८ ते २००४ दरम्यान विधान सभेचे १८ तर लोकसभेचे ३ मतदासंध अनुसूचित जातींसाठी राखीव ठेवण्यात आले होते. मतदारसंधाच्या पुर्नरचनेनंतर विधानसभेच्या २८ तर लोकसभेच्या ५ जागा अनुसूवित जातींसाठी राखीव करण्यात आल्या आहेत.

आज महाराष्ट्रामध्ये आंबेडकरी राजकारण करणारे पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाचे विविध गट व बहुजन समाज पक्ष हे ओळखले जातात. यांनी स्वातंत्र्यानंतर ५० वर्षामध्ये डॉ. आंबेडकरांच्या पश्च्यात रिपब्लिकन पक्षामार्फत राज्य व देशाच्या निवडणूका लढविल्या सोबतच्या तक्याच्या आधारे पक्षांना ५ टक्केपेक्षा जास्त जागा जिंकता आल्या नाहीत. त्यामूळे राखीव जागांचा फायदा हा खऱ्या अर्थाने मागास जातींना किंवा त्यांचे राजकारण करणाऱ्या पक्षांना होताना दिसून येत नाही.

| पक्ष | जिंकलेल्या जागा | मिळालेली मते | राखीव मतदार संघामध्ये मिळालेल्या मतांची टक्केवारी | एकूण मतदानापैकी मिळालेल्या मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाजप | १५ | ११३०८१७ | ५५.९८ | २.१३८ |
| काँग्रेस | २ | १०४८३६ | ५.१९ | ०.१९८ |
| राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | ३ | २३२२०९ | ११.५० | ०.४३९ |
| शिवसेना | ९ | ५५२१८२ | २७.३४ | १.०४४ |
| एकूण | २९ | २०२००४४ | १००.०० | ३.८१९ |

२०१४ विधानसभा निवडणूकीमध्ये राखीव मतदारसंघ आणि निवडूण आलेला पक्ष केवळ मागास जातीचे राजकारण करणाऱ्या पक्षांच्या स्वतःच्या अंगभूत मर्यादा आहेत. आजही प्रत्येक जातीनं आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केल्यामूळे मागास म्हणणाऱ्या जाती एकजिनसी स्वरूपात नाहीत त्यामूळे प्रत्येक जातींचा स्वतंत्र पक्ष व संघटना अस्तित्वात आली आहे. लोकशाही प्रक्रियेमध्ये मागास जातींनी स्वतःचे अस्तित्व दाखविण्याच्या प्रयत्नामध्ये प्रत्येक जात ही एकमेकांपासून दुरावलेली आहे. त्यामूळे मागसाजातींच्या वेगवेगळया पक्षांना आपआपल्याजातींच्या मतांवर अवलंबून रहावे लागते  व त्यांना इतर जातींची मते मिळत नाहीत असे दिसून येते. १६३२ साली जी परिस्थिती होती ती आजही पहावयास मिळते आहे. महाराष्ट्रातील काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व भाजप या प्रमुख पक्षांनी मागासजातींच्या उमेदवारांना आपले बटीक बनविले आहे अशी भावना मागास जातींमध्ये आहे. अशा पक्षातील उमेदवार स्वतंत्रपणे आपल्या जातींचे काम पक्षाच्या धोरणांमूळे करता येत नाहीत.

### *लोकसभा निवडणूक 2014*

या पार्श्वभूमिवर २०१४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीतील रिपाईची कामगिरी, पक्षाची धोरणे, कार्यक्रम व पक्षाचे पुढील काळात असलेले अस्तित्व याची चर्चा करण्याचा येथे प्रयत्न करण्यात आला आहे. याबरोबरच मागास जातीचे राजकारण करणाऱ्या पक्षांचे राखीव मतदार संधामध्ये काय अस्तित्व आहे याचाही आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राची निवडणूक  मुख्यतः कॉग्रेस राष्ट्रवादीची कामगीरी, मोदी लाट, मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार आणि महायुती– काँग्रेस विरूद्ध काँग्रेस या प्रश्नांवरच प्रामुख्याने झाल्याचे दिसून येते. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसची महाराष्ट्रामध्ये सत्ता १६६६ पासून आजतागायत आहे. या काळात आधाडी शासनाने केलेल्या कामाचा प्रभाव लोकसभानिवडूकीत दिसून आला नाही त्यामूळे शासनाने विविध जाहीरातींच्या माध्यमातून केलेल्या कामाचा पाढा लोकापुढे विविध वृत्तपत्र व वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून वाचाला. याचा आधाडीला फायदा झाला नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाना जागावाटपाचा मुद्दा सोडवता आला नाही आणि लोकांची काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस सरकारवरची नाराजी दुर झाली नाही. शासनाने मराठा मुस्मिम आरक्षण धनगर आरक्षण याचा मुद्दे हाताळण्यात कांही प्रमाणात यश मिळाले परंतू नारायण राणेयांनी मुख्यमंत्र्यावर तोफ डागून बंडाचा झेंडा फडकवून तो म्यान केल्यामूळे कोकणातील अनेक राणे समर्थक पक्ष सोडून गेल्यामूळे काँग्रेसच्या अडचणीत आणखी भर पडली. असे असले तरी महाराष्ट्रामध्ये मोदीलाटेचा प्रभाव चालला हा महत्वाचा मुद्दा आहे. महाराष्ट्रामध्ये मोदी लाटेमूळेच शिवसेनेला आणि महायुतीच्या धटकपक्षांना फायदा झाला. यामूळे महाराष्ट्रामध्ये शिवसेनेसह महायुतीच्या धटक पक्षांनाही आपला प्रभाव वा आपले अस्तित्व सिद्ध करता आले नाही.

आंबेडकरी राजकारण करणारे विविध गटांपैकी महत्वाचा असणारा  रामदास आठवले यांच्या गटास भाजपाने रामदास आठवले यांना राज्यसभेची उमेदवारी दिल्यामुळे  त्यांचे लोकसभा निवडणुकीतील अस्तित्व संपुष्टात आले. दुसरा गट प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचा भारिप बहुजन महासंध हा होय. अकोला मतदासंध सोडता इतर मतदारसंधामध्ये यापक्षाचे अस्तित्व दखलपात्र नाही. तीसरा गट चालविणारे जोगेंद्र कवाडे यांनी सुरूवातीस काँग्रेसची युती करून सर्व उमेदवार मागे धेतले त्यामूळे त्यांचे  लोकसभा निवडणुकीतील अस्तित्व संपुष्टातच आले.

### लोकसभा 2014 मधील रिपब्लिकन गटांची स्थिती

| अ.क्र. | पक्ष | मिळालेली मते | उमेदवारांची संख्या | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | बहुजन समाज पक्ष | १२७१६९३ | ४८ | २.६१ |
| २. | भारीप बहुजन महासंघ | ३६०८५४ | २३ | ०.७४ |
| ३. | बहुजन मुक्ती पक्ष | २०५५४४ | ४७ | ०.४२ |
| ४. | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | ७३९८४ | ९ | ०.१५ |
| ५. | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) | ७१८०८ | १ | ०.१४ |
| ६. | भारतीय आंबेडकरवादी पक्ष | ३७३०१ | १४ | ०.०७६ |
| ७. | आंबेडकरवादी रिपब्लिकन पक्ष | १६४६१ | ४ | ०.०३३ |
| ८. | प्रबुद्ध रिपब्लिकन पक्ष | १४२३८ | १० | ०.०२९ |
| ९. | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खोब्रागडे) | ७३५४ | ३ | ०.०१५ |
| १०. | आंबेडकर नॅशनल काँग्रेस | ४७२८ | ३ | ०.००९ |
| ११. | रिपब्लिकन बहुजन सेना | २९१० | २ | ०.००५ |
| १२. | रिपब्लिकन पक्ष(खोरिप) | २७३६ | १ | ०.००५ |
| १३. | आंबेडकर समाज पार्टी | ९८७ | १ | ०.००२ |
| एकूण | | २०७०५९८ | १६६ | ४.२५ |

सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये महाराष्ट्रातील आंबेडकरी पक्ष आणि त्यांना मिळालेली मते व एकूण मतदानानुसार टक्केवारी देण्यात आलेली आहे. यावरून असे दिसते की सर्व पक्षांना मिळून एकूण ४.२५ टक्के मते मिळाली यामध्ये बसपा २.६१ टक्के सोडता इतर गटांना १ टक्कही मते मिळविता आलेली नाहीत असे दिसते. निकालानंतर भाजपास देशामध्ये स्पष्ट बहूमत मिळाले या निवडणूकीचे विश्लेषण विविध विचारवंतांनी केले. या निवडणूकीत दलित मते ही भाजपकडे गेल्याचे विश्लेषणातून व निकालावरून स्पष्ट झाले आहे.

कांही विचारवंतांच्या मते मोदी लाटेमूळे जाती आणि धर्माच्या राजकारणाला संपवून टाकले आहे. परंतू हे जर खरे असते तर भाजपला इतके मोठे यश मिळाले नसते. भाजपाच्या यशाचा अर्थ आहे की लोकांनी जात आणि धर्माच्या नावावरच मतदान केले आहे. भाजपाच्या या यशामध्ये जर कोण जबाबदार असेल तर तो काँग्रेस पक्ष आणि येथील इतर सर्व सत्ताधारी पक्ष यांच्याकडे या मोदी लाटेला किंवा जाती धर्माच्या राजकारणाला थांबविण्याचे कोणतेही साधन उपलब्ध नव्हते. केवळ मोदी मुस्लिम विरोधी आहे असा प्रचार केला गेला आणि हिंदू मतदारांचे ध्रुविकरण झाले. तर मायावती आणि इतर दलीत पक्षाच्या नेत्यांनी त्यांना दलित विरोधी म्हटले गेले. प्रत्यक्षामध्ये मायावतीकडून मोदींना दलित विरोधी असा प्रचार केला गेला तर महाराष्ट्रात रामदास आठवले यांनी काँग्रेसचेच राजकारण हे दलित विरोधी आहे असा प्रचार केला. यातून दलितांचे काँग्रेसविरोधी राजकारण महाराष्ट्रामध्ये करण्याचा प्रयत्न केला गेला त्यामूळे मोदींची दलित विरोधी प्रतीमा महाराष्ट्रात रूजू शकली नाही याचा परिणाम म्हणून की काय राखीव मतदारसंघामध्ये प्रबळ मागास जातींनाच भाजपकडून उमेदवारी दिली गेल्यामूळे भाजपला याचा फायदा झाला. याचा अर्थ मोदी केवळ मुस्लिम विरोधी किंवा दलित विरोधीच आहेत अशा पद्धतीचे विवेचन करणे होय. भाजपा व संघ परिवार हा यापेक्षा कितीतरी वेगळा आहे कारण यांचा उद्देश हा सांस्कृतिक राष्ट्रवाद निर्माण करणे हा आहे. दलित आणि मुस्लिम या राष्ट्रवादाचा छोटासा भाग आहेत. जर भाजपाचा हा सांस्कृतिक राष्ट्रवाद लोकांना निटपणे कळला असता तर भाजपाला अशा प्रकारचे यश मिळणे कठिण झाले असते.

महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये भाजपच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाचा प्रचार काँग्रेस व इतर पक्षांमार्फत करण्यात आला नसल्याचेच दिसून येते. याला येथील सर्व प्रस्थापित तसेच पुरोगामी पक्षही तितकेच जबाबदार आहेत. २००७ मध्ये मायावती यांनी उत्तर प्रदेशामध्ये सोशलइंजिनियरिंग चा प्रयोग करून येथील ब्राम्हणांना सोबत घेण्याचा प्रयत्न केला. ब्राम्हणांची गरज होती म्हणून ब्राम्हणांनी मायावतींना पाठींबा दिल्याचे दिसते परंतू मोदींना पाठिंबा देताना दलितांना कोणतही गरज अथवा आवश्यकता होती हे दिसून येत नाही. तरीही मोदीच्या राजकारणाने दलितांना सोबत घेण्याचा प्रयत्न करून एका वेगळया प्रकारे आपला सांकृतिक राष्ट्रवाद मांडण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते.

तसेच दलित मतदान भाजपा कडे जाण्याचे एक कारण असेही आहे की, कांही मध्यमवर्गीय दलित युवकांचे हिंदू धर्माच्या प्रथा परंपरांशी जवळीक निर्माण होणे, युवा पिढी अधिकाधिक वेळ या हिंदू मित्रांसमवेत घालवतात, कामाच्या ठिकाणचे सहचारी असतात, त्यांचे रोजचे उठणे बसणे, खाने पिणे होत असते, धरी येणे जाणे असते, एकदुसऱ्याच्या सुख दुःखामध्ये सहभागी होतात हे सबंध इथपर्यंत विकसीत झाले आहेत की, हे युवक आपल्या हिंदू दोस्तांसमवेत मंदीरामध्येही जातात आणि त्यांच्या हिंदू देवी देवतांच्या सण उत्सवामध्येही सहभागी होतात यातून दलित युवकांना या संबंधांमूळे केवळ हिंदू जाणीवेशी जोडले गेले नाही तर हिंदूत्ववादी राजकारणाशीही जोडले गेले आहे आणि या हिंदूत्वादी राजकारणामूळे त्यांना मुस्लिम विरोधीही बनविल्याचे दिसून येत आहे.

### विधानसभा2014 :—

### विधानसभा2014 मधील रिपब्लिकन पक्षाची स्थिती

| अ.क्र. | पक्ष | उमेदवारांची संख्या | मिळालेली एकूण मते | रिपब्लिकन पक्षास मिळालेली मतांची टक्केवारी | एकूण मतदाना पैकी रिपाईला मिळालेल्या मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बहुजन समात पक्ष | २८० | ११९१७४९ | ५८.५८ | २.२५३ |
| २ | भारिप बहुजन महासंघ | ७० | ४७२९२५ | २३.२५ | ०.८९४ |
| ३ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (आ) | ५ | १००५८० | ४.९४ | ०.१९० |
| ४ | बहुजन मुक्ती पार्टी | १३३ | ९७४३१ | ४.७९ | ०.१८४ |
| ५ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया | ३९ | ६३२०३ | ३.११ | ०.११९ |
| ६ | पँथर्स रिपब्लिकन पार्टी | १ | ३५३४८ | १.७४ | ०.०६७ |
| ७ | भारतीय आंबेडकरवादी पक्ष | ४० | २३१४७ | १.१४ | ०.०४४ |
| ८ | रिपब्लिकन सेना | २६ | २३०४९ | १.१३ | ०.०४४ |
| ९ | आंबेडकरवादी रिपब्लिकन पक्ष | १९ | ७३६५ | ०.३६ | ०.०१४ |
| १० | रिपब्लिकन पक्ष (खोरिपा) | १३ | ५७५६ | ०.२८ | ०.०११ |
| ११ | रिपब्लिकन बहुजन सेना | १० | ४१५३ | ०.२० | ०.००८ |
| १२ | प्रबुद्ध रिपब्लिकन पक्ष | ७ | ३१२८ | ०.१५ | ०.००६ |
| १३ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया एकतावादी | ५ | २४०९ | ०.१२ | ०.००५ |
| १४ | आंबेडकर नॅशनल कॉंग्रेस | ३ | १४२४ | ०.०७ | ०.००३ |
| १५ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (कांबळे) | २ | ६८७ | ०.०३ | ०.००१ |
| १६ | बहुजन समाज पक्ष (आंबेडकर) | २ | ६६४ | ०.०३ | ०.००१ |
| १७ | बहुजन रिपब्लिकन एकता मंच | १ | ५२९ | ०.०३ | ०.००१ |
| १८ | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (खोब्रागडे) | ३ | ३९५ | ०.०२ | ०.००१ |
| १९ | भारतीय दलित कॉंग्रेस | १ | २८७ | ०.०१ | ०.००१ |
| | एकूण | ६६० | २०३४२२९ | १००.०० | ३.८४५ |

या निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाच्या एकूण १६ गटांनी निवडणूक लढविली एकूण २०३४२२६ मते व ३.८४ टक्के मतदान झाले आहे. १६ गटांपैकी १३ गटांचा मुख्य आधार हा विदर्भ असल्याचे दिसते. यामध्ये सर्वाधिक मतदान बहुजन समाज पक्षास मिळाल्याचे दिसून येते तसेच सर्व रिपाई गटाच्या मिळालेल्या मताच्या ५० टक्के पेक्षा अधिक मतदान बसपास मिळाले आहे. बसपा ला विदर्भात सर्वाधिक मतदान मिळाले आले त्यानंतर मराठवाडयात पक्षाला कांही प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याचे दिसते. आजही या पक्षास विदर्भाच्या बाहेर प्रतिसाद मिळताना दिसून येत नाही. या खालोखाल भारिप बहुजन महासंघ या प्रकाश आंबेडकर यांच्या गटास मिळाले आहे. त्यानांही विदर्भात सर्वाधिक मतदान मिळाले आहे. भारिपला एकूण रिपाईला मिळालेल्या मताच्या २३ टक्के इतकी मते मिळाली आहेत. त्याखालोखाल रामदास आठवले यांच्या गटास ४ टक्के मतदान झाले त्यांनी भाजपशी युती केल्यामूळे त्यांना केवळ ५ जागा लढविल्या होत्या. त्या खालोखाल बहुजन मुक्ती पार्टी या पक्षास ४ टक्के इतके मतदान झालेले दिसते. बामसेफ या संघटनेचे अध्यक्ष असलेले वामन मेश्राम यांनी या पक्षाची स्थापना करून या निवडणुकीत १३३ मेदवार उभे केले. बामसेफ च्या माध्यमातून केलेल्या कामामुळे त्यांना या निवडणुकीत मते मिळाले या पक्षाला विदर्भात जास्त माले मिळतील असे अपेक्षित असताना पश्चिम महाराष्ट्रात पक्षाला इतर विभागाच्या तुलनेने चांगला प्रतिसाद मिळालेला दिसतो.

### *रिपब्लिकन पक्षाचे विभागवार विवेचन :—*

**2014 विधानसभा निवडणूकीत विभागनिहाय रिपब्लिकन पक्षास मिळालेली मते**

| विभाग | उमेदवारांची संख्या | मिळालेली एकूण मते | रिपब्लिकन पक्षास मिळालेली मतांची टक्केवारी | एकूण मतदाना पैकी रिपाईला मिळालेल्या मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| पूर्व विदर्भ | १०९ | ५६४५८७ | २७.७५ | १.०६७ |
| पश्चिम विदर्भ | १०८ | ६६३४३० | ३२.६१ | १.२५४ |
| कोकण | २५ | ३३९५२ | १.६७ | ०.०६४ |
| मराठवाडा | १३१ | ३३१९३२ | १६.३२ | ०.६२७ |
| मुंबई— ठाणे | ११३ | १५९५३८ | ७.८४ | ०.३०२ |
| उत्तर महाराष्ट्र | ५५ | ७१०१४ | ३.४९ | ०.१३४ |
| पश्चिम महाराष्ट्र | ११९ | २०९७७६ | १०.३१ | ०.३९७ |
| एकूण | ६६० | २०३४२२९ | १००.०० | ३.८४५ |

रिपब्लिकन गटाचे विभागवार स्थिती पाहीली तर असे दिसते कि, सर्व गटांना विदर्भामध्ये सर्वाधिक मतदान मिळाले आहे. त्या खालोखाल मराठवाडयात मतदान झाल्याचे दिसून येते. रिपाईच्या १८ गटांनी या निवडणूकीत सहभाग घेतला आहे पैकी केवळ ३ गटांनाच दखलपात्र मतदान झाल्याचे चित्र या निवडणूकीत पहावयास मिळते. कोकणात केवळ बसपाला दखलपात्र मतदान झाले तर मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र या ठिकाणी बसपा व भारिप बहुजन महासंघाला मतदान झाले आहे. तर मुंबई मध्ये आठवले गट आणि बसपा यांना मतदान झाल्याचे दिसून येते. विदर्भात बसपा, बहुजन मुक्ती पार्टी, व भारिप यांना मतदान झाल्याचे दिसते. यावरून आजमितीस महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात असलेल्या गटांपैकी केवळ बहुजन समाज पक्ष व भारिप बहुजन महासंध या दोन पक्षांना दखलपात्र मतदान झाल्याचे दिसून येते. या शिवाय रामदास आठवले यांनी भाजपाशी युती केल्यामूळे त्यांचे केवळ ५ उमेदवार निवडणूकीस उभे होते, तर जोगेंद्र कवाडे यांना कॉंग्रेसने विधान परिषदेवर घेतल्याने त्यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविली नाही त्यामूळे त्यांच्या पक्षाचा फारसा प्रभाव या निवडणूकीत पहावयास मिळाला नाही. सुलेखा कुंभारे यांच्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी यांनी केवळ ५ जागा लढविल्या व त्यांना केवळ २४०० इतकीच मते मिळाली त्यामूळे त्यांचे अस्तित्वही या निवडणूकीत जाणवले नाही. एकूणच रिपब्लिन पक्षाचे अस्तिवात असलेले रिपाई आठवले गट, रिपाई गवई गट, रिपाई कवाडे गट, रिपाई खोब्रागडे गट, रिपाई कांबळे गट यांचाया निवडणूकीमध्ये कांहीच अस्तित्व जाणवले नाही.

एकूणच महाराष्ट्रामध्ये रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सत्तासंतुलक पक्ष म्हणून असलेले अस्तित्व संपुष्ठात येत आहे का अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच रिपब्लिकन गटांचा पारंपारिक मतदार हा अधिकाधिकपणे इतर पक्षांकडे गेल्याचे या निवडणूकीतील मतानुसार दिसून येते. तर सत्तासंतुलक म्हणून असलेले आपले अस्तित्व हा पक्ष गमावून बसला आहे की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. मुख्यतः रिपाईच्या आठवले गटांनी भाजपा शिवसेनेशी युती केल्यामूळे यांचा पारंपारिक मतदार यांच्या पासून दुरावला तर नवीन मतदार इतर पक्षांकडे सरकला, तर कवाडेंडा पारंपारिक मतदार बसपा, भारिप आणि कॉंग्रेस आणि तत्सम पक्षांकडे गेला आहे. अनेक वर्षापासून गवई गटाची कॉंग्रेसशी युती असल्याकारणाने याचा पारंपारीक व नवीन मतदार कॉंग्रेस सोबतच राहीला आहे असे दिसून येते.

**मतदारसंघनिहाय इतर पक्ष आणि रिपब्लिकन गटांची स्थिती**

| मतदारसंघ | इतर पक्ष | | | रिपाई गट | | | एकूण उमेदवार | मिळालेली एकूण मते | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण उमेदवार | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | एकूण उमेदवार | मिळालेली मते | मतांची टक्केवारी | | | |
| अनुसूचित जातींसाठी राखीव (२९) | ४१८ | ४६७०५०६ | ८.८३ | ९८ | ४५२४५० | ०.८६ | ५१६ | ५१२२९५६ | ९.६८ |
| अनुसूचित जमातींसाठी राखीव (२५) | २३४ | ४२८५६३१ | ८.१० | ३६ | ९७९९५ | ०.१९ | २७० | ४३८३६२६ | ८.२९ |
| अराखीव (२३४) | ३०९५ | ४१९१११०४ | ७९.२२ | ५२६ | १४८३७८४ | २.८० | ३६२१ | ४३३९४८८८ | ८२.०३ |
| एकूण | ३७४७ | ५०८६७२४१ | ९६.१५ | ६६० | २०३४२२९ | ३.८५ | ४४०७ | ५२९०१४७० | १००.०० |

या निवडणूकीचे आणखी कांही महत्वाची पैलू येथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. यामध्ये अनुसूचित जातींसाठी राखीव असणाऱ्या मतदार संधामध्ये रिपाईच्या गटांना केवळ ०.८६ टक्के इतकीच मते मिळाली तर अराखीव मतदारसंधामध्ये २.८० टक्के इतकी मते मिळाली याचा अर्थ राखीव मतदार संधाचा रिपब्लिकन पक्षास फारस फायदा झालेला नाही.

### रिपब्लिकन पक्ष आणि युती / आघाडी

सोबतच्या तक्त्यावरून रिपाइला प्रत्येक निवडणूकीत साधारणपणे ३.८५ टक्के मते मिळाल्याचे सातत्याने दिसून येते. असे असले तरी महाराष्ट्रामध्ये एक प्रभावी विरोधी पक्ष म्हणून या पक्षाचे अस्तिव आढळून येत नाही. तसेच हा अस्मितादर्शी पक्ष म्हणूनही आपली ओळख गमावून बसला आहे की काय अशी शंका उपस्थित होते. याच्यया अनेक कारणांपैकी प्रामुख्याने एक कारण म्हणजे या पक्षाची अनेक शकले महाराष्ट्राच्या राजकारणात आपणास पहावयास मिळतात. २०१४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत या पक्षाच्या प्रमुख १६ गटांनी निवडणूकीत सहभाग धेतल्याचे दिसून येते. यामूळे महाराष्ट्रामध्ये पक्षाची एकत्रित असणारी ताकद वेगवेगळया गटांमध्ये विभाजीत झाल्याची दिसून येते. त्यामूळे रिपब्लिकन पक्ष म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात हा पक्ष आपला प्रभाव निर्माण करताना दिसून येत नाही. स्थानिक पातळीवरील व छोटया राजकीय पक्षांची यामूळे कोंडी झाल्याचे दिसून येते. या पक्षांना स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी कोणत्या ना कोणत्या पक्षाशी हातमिळवणी करावी लागते. यामूळेच रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांनीही आपले अस्त्वि टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने विविध पक्षांशी हातमिळवणी केल्याचे दिसून येते.

युती व आधाडयाच्या राजकाराणामूळे रिपब्लिकन पक्षाला निवडणूकीच्या राजकारणामध्ये फारसा फायदा झाला आहे असे पक्षाच्या आजच्या स्थिती वरून दिसून येत नाही. या युत्या किंवा आधाडया करताना पक्षाने स्वतःचा मतदार मजबूत करून इतर पक्षांशी युती न केल्यामूळे पक्षाला या राजकारणात यश मिळाल्याचे दिसून येत नाही. असा सर्वसाधारण निष्कर्ष काढता येऊ शकेल कारण युतीच्या राजकारणामध्ये पक्षाची स्वतःची असलेली ताकद त्यानुसार जागा वाटप होत असे या निकषाच्या आधारे पक्षाला अत्यल्प जांगावरच समाधान मानावे लागत असे त्यामूळे अत्यल्प जागासाठी सर्व मतदारसंधातील युतीच्या उमेदवारास मतदान करावयास सांगणे यातून प्रस्थापित पक्षाच्या उमेदवारास मतदान करण्याची वृत्ती रिपाईच्या उमेदवारांमध्ये निर्माण झाली व प्रत्येक निवडूकीतील याच धोरणामूळे रिपाईचा मतदार रिपाईपासून सरकत गेल्याचेचे चित्र आपणास पहावयास मिळते. यामूळे युतीची अपरिहार्यता व व पक्षाचा मतदार यांच्यामध्ये समतोल साधने कधीच शक्य झाले नाही. यालाच पर्याय म्हणून की काय रिपाईचा मूळ मतदार कांही मतदारसंधामध्ये बहूजन समाज पक्षाकडे आकृष्ट होतो आहे की काय असे दिसून येते.

२००४ व २०१४ च्या लोकसभा व विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांकडे पाहिले तर आज महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात असलेल्या पक्षामध्ये रिपब्लिकन पक्षाचा मतदार विरधळून गेल्याचे चित्र दिसून येते आहे. स्थानिक पातळीवरील युतीच्या राजकारणाने दुरऱ्या टप्प्यातील कार्यकर्ता प्रमुख पक्षाचा धटक बनला व त्याचे कार्यकर्तेही या पक्षांचे धटक बनल्याचे दिसून येते. त्यामूळे नव्याने उदयास येणाऱ्या तरूण पिढीला रिपाईकडे आइष्ट करण्यासाठी स्थानिक नेतृत्व कमी पडल्याचे दिसून येते. त्याचा परिणाम हा प्रबळ सत्ताधारी पक्षांकडे नवीन नेतृत्वाला संधटीत करण्याच्या यंत्रणा अस्तित्वात आहेत व त्याचबरोबर तरूणांमध्ये आपला सहकारी मित्र ज्या पक्षामध्ये तिकडे आकृष्ट होण्याचा कल असतो ती बाब मागास तरूणांमध्येही असल्याचे दिसून आले हा ही मित्रांच्या सहकार्याने विचाराने न जाता भावनिकतेने इतर पक्षामध्ये पदाधिकारी होताना दिसून येतात.

अशा कोंडीतून मार्ग काढण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी व मतदारांनी अनेक स्थानिक आधाडया केल्या तसेच नव नवीन प्रयोग करण्याचा प्रयत्नही केला यामध्ये रिडालोसचा प्रयोग २००६ च्या विधानसभा निवडूकीत दिसून येतो. तर आता रामदास आठवलेंचीच सेना भाजपा सोबतची युती ही त्याची उदाहरणे आपणास सांगता येतील. तर मतदारांनी बहूजन पक्षास आपला जवळाचा पर्याय मानल्याचे दिसून येते.

| अ. क्र. | पक्ष | उमेदवारांचे सरासरी वय |
|---|---|---|
| १ | काँग्रेस | ४३ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | ४३ |
| ३ | शिवसेना | ३७ |
| ४ | भाजप | ४० |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ३७ |
| ६ | बहुजन समाज पक्ष | ४१ |
| ७ | कम्युनिष्ट पक्ष | ५२ |

याचीच दुसरी बाजू अशी आहे की यामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या मतदारांना जसे रिपब्लिकन नेत्यांनी गृहित धरेल आहे तसेच प्रस्थापित पक्षाच्या नवीन नेतृत्वाने गृहित धरण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आता काँग्रेसचे धरानेशाहीमार्फत नवीन पिढीचे उमेदवार केंद्रापासून राज्यामध्येही दिसून येतात यामध्ये अजित पवार, सुप्रिया सुळे, पंकजा मुंडे, आदित्य उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांनी तरूणाईला राज्यपातळीवरून आकर्षीत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. तर स्थानिक पातळीवरील राजकारणात प्रस्थापित पक्षांनी तरूण उमेदवार देण्याचा प्रयत्न केला आहे. सन २०१२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीतील उमेदवारांचे पक्ष निहाय सरासरी वय काढले आहे यावरून प्रस्थापित पक्षाचे तरूणाईची भरती किती प्रमाणात झाला आहे हे लक्षात येते.

### महाराष्ट्राच्याराजकारणात रिपब्लिकन नेतृत्त्वास असलेला आवकाश

आजवरच्या पक्षाच्या वाटचालीचा विचार करता महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन मतदारसंध पुर्नरचनेनंतर रिपब्लिकन नेतृत्वास काय आवकाश आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. महाराष्ट्राच्या राजकारणात अस्तित्त्वात असलेल्या पक्षांचा व त्यांच्या प्रभावाचा विचार करता स्वबळावर निवडूण येण्याची रिपब्लिकन पक्षांची आज तरी परिस्थिती नाही. पक्षाचा मतदार हा नवबौद्ध समाजापूरताच मर्यादीत राहीला. या समाजाच महाराष्ट्रातील लोकसंख्या ही महाराष्ट्रातील एकुण लोकसंख्येच्या सरासरी ८ टक्के एवढी आहे. महाराष्ट्राच्या मुंबई, मराठवाडा व विदर्भ या भागात ही टक्केवारी सरासरीपेक्षा खूप अधिक आहे. परंतू २००८ साली झालेल्या मतदारसंध पुर्नरचनेनंतर मतदारसंधनिहाय नवबौद्धांची संख्या पाहिली तर ती प्रत्येक मतदारसंधनिहाय अल्पसंख्य असलेली दिसून येते. रिपब्लिकन गटांमूळे नवबौद्धांच्या मतांमध्ये फूट पडते व त्याचा फायदा कोणत्याही गटांना होताना दिसून येत नाही. तसेच महाराष्ट्रात अनुसूचित जातींची १५ टक्केपेक्षा लोकसंख्या असणारे मतदारसंध हे ५४ आहेत

तर लोकसभेच्या ५ मतदारंसधात अनुसूचित जातींची संख्या जास्त आहे. १५ ते २० टक्केमतदानाच्या आणि तेही सर्वच्या सर्व एकगठ्ठा मिळाले आणि शंभरटक्के झाले तर ते ३० ते ६० हजाराच्या दरम्यान होते पण तशी शक्यता फारच नगण्य असते. तसेच एकुण मतदारसंधातील लोकसंख्येचा विचार केला तर एक मतदारसंध साधारणतः २ ते ३ लाख लोकसंख्येचा असतो या ३ लाखामध्ये ३० ते ६० हजार मते ही निवडून येण्यास पुरेशी नसतात ही वस्तूस्थिती आहे.

असे असले तरी रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्रातील एक सत्ता संतूलक पक्ष म्हणून अस्तित्त्वात राहू शकतो. धार्मीक सांस्कृतिक राजकारणाच्या माध्यमातून साधनांची निर्मीती करूनच या पक्षाची बांधणी होऊ शकते. मध्यम वर्गाकडून साधनांची उभारणी करून त्याचा वापर चळवळीसाठी करणे ही सर्वात महत्वाची गरज पक्षासमोर आहे. स्वतंत्र निवडणूका लढविणे व जिंकणे हे आज तरी पक्षासाठीची अशक्यप्राय गोष्ट आहे. अशा परिस्थितीत महाऱ्ााच्या राजकारणात रिपब्लिकन पक्षांस इतर पक्षांच्या युती शिवाय मार्ग नाही. यामध्ये आज महाराष्ट्रात अस्तित्त्वात असलेल्या कोणत्या पक्षांबरोबर रिपाईने युती करावी हा प्रश्न आहे. साधारणपणे आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात यासंबंधीचे मुख्यतः दोन प्रवाह दिसून येतात एक म्हणजे धर्मनिरपेक्ष पक्षांशी युती तर दुसरा धर्मवादी पक्षांशी युती केली जाते. तर कांही पक्ष तिसरा पर्याय म्हणून तिसरी आधाडी करण्याचा प्रयत्न करतात, पंरतु आजवरच्या अनुभवावरून या केलेल्या आधडच्यांचाही पक्षाला कोणताही फायदा होताना दिसत नाही. तरीही अन्य पक्षांशी यूती करण्याचा मार्ग स्विकारताना पक्षाने स्वतःचा स्वाभीमानी जनाधार मजबूत करणे आवश्यक आहे. असे केले तरच युतीचे राजकारण जास्त फळदायी होऊ शकते. तसेच महाराष्ट्राच्या राजकारणात अस्तित्वहीन बनलेल्या रिपब्लिकन पक्षास जर आपले अस्तित्व परत एकदा निर्माण करावयाचे असेल तर पक्षाची बांधणी, पक्षाचे मतदान इतर पक्षांकडे गेले आहे ते परत रिपब्लिकन पक्षांकडे आणण्यासाठी कांही ठोस कायक्रम नव्याने उदयास आलेल्या तरूण वर्गास पक्ष संधटना व चळवळीशी जोडण्यासाठीचा कार्यक्रम व नवीन कार्यकर्त्यांना शिबीरांची आवश्यकता, रिपब्लिकन नेतृत्त्वाचा जनाधार इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांकामध्ये वाढविण्यासाठीचे प्रयत्न या बाबींकडे गांर्भीयाने पाहणे गरजेचे बनले आहे असे केले तरच महाराष्ट्राच्या राजकारणात रिपब्लिकन नेतृत्व आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकतो.



*संघरत्न सोनवणे*
*संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सा. फु. पुणे विद्यापीठ, पुणे.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com